ePaper
विनोद कांबळीच्या मदतीसाठी एकनाथ शिंदे धावले, तात्काळ आर्थिक मदतीची केली !

॥ वर्ष - 8 । अंक -166 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 25 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- हरलीनचे पहिले आंतरराष्ट्रीय शतक
- तिसऱ्या कसोटीसाठी कोटियनला संधी
- निर्मला सीतारमण जीनियस आहेत!
- भागवत हिंदू धर्माचे प्रमुख नाहीत

### मंत्रिमंडळ विस्तार आणि खातेवाटपात चित्र स्पष्ट

# महायुतीत भाजपाच मोठा भाऊ!

## अमित शाहः महत्त्वाच्या खात्यांबाबत आम्ही कुठलीही तडजोड करणार नाही

। मुंबई । महाईन्यूज

**महाराष्ट्रात महायुतीचं सरकार आलं आहे. तसंच २१ डिसेंबरला खातेवाटपही पार पडलं आहे. मागच्या सरकारपेक्षा या सरकारमध्ये बराच फरक आहे. कारण भाजपा मोठ्या भावाच्या भूमिकेत आहे. काही सूक्ष्म बदल करत भाजपाने मोठा भाऊ असल्याचा वरचष्मा कायम ठेवला आहे. एकनाथ शिंदेंची शिवसेना आणि अजित पवारांची राष्ट्रवादी यांच्यातली स्पर्धा आहेच. दुसरीकडे भाजपाने मात्र आपलं वर्चस्व कायम ठेवल्याचं दिसून येतं आहे यात काहीच शंका नाही.**



### निकालात कुणाला किती जागा?

२३ नोव्हेंबरला जो निकाल लागला त्यात भाजपाचे १३२ आमदार निवडून आले. तर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेला ५७ जागा मिळाल्या, तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला ४१ जागा मिळाल्या. त्यामुळे भाजपाकडे सर्वाधिक मंत्रिपदं आणि मुख्यमंत्री हे महत्त्वाचं पद राहणार हे सरळ होतं. भाजपाकडे २० मंत्रिपदं मिळाली आहेत तर राष्ट्रवादी आणि शिवसेना १२ आणि १० पदं मिळाली आहेत.

अशात मंत्रिमंडळ विस्तार झाल्यानंतरही कठीण होतं ते खातेवाटपाचं काम. ज्यासाठी जवळपास १५ दिवसांचा कालावधी लागला.

### भाजपाच्या सूत्रांनी सांगितलं?

भाजपाच्या एका वरच्या फळीतल्या नेत्यांच्या सूत्रांपैकी एकाने इंडियन एक्स्प्रेला सांगितलं की एकनाथ शिंदे एक पायरी खाली उतरत उपमुख्यमंत्री हे पद घ्यायला तयार झाले. पण भाजपावर त्यांनी दबाव टाकून पाहिला होता. तर दुसरीकडे अजित पवारांची राष्ट्रवादी महत्त्वाच्या खात्यांसाठी जास्त आग्रही होती हे कळलं. एकनाथ शिंदे यांना कळून चुकलं होतं की त्यांना मुख्यमंत्री होता येणार नाही त्यामुळे ते गृहमंत्री पदासाठी आग्रही होते.

मात्र भाजपाने ते पदही आपल्याकडेच ठेवलं. त्यानंतर नगर विकास, महसूल आणि पाटबंधारे विभाग ही खाती मागितली गेली. त्यांनी एकूण १३ मंत्रिपदं मागितली होती. तसंच ते उपमुख्यमंत्री होण्यासही शेवटच्या क्षणी तयार झाले होते. भाजपाने त्यांना १२ कॅबिनेट मंत्रिपदं दिली. तसंच भाजपाने राम शिंदेंना विधान परिषद अध्यक्ष केलं. भाजपा आणि शिवसेनेतल्या अंतर्गत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार उद्योग मंत्रिपदावरुनही भाजपा आणि शिवसेनेत थोडेफार खटके उडाले होते. मात्र अखेर हे पद उदय सामंत यांना मिळालं. शिवसेना हे पद आपल्याकडे ठेवण्यात यशस्वी ठरली.

### महत्त्वाच्या खात्यांबाबत अमित शहांचे स्पष्टीकरण

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह महाराष्ट्र दौऱ्यावर आले होते. त्यांनी हे स्पष्ट केलं होतं की महत्त्वाच्या खात्यांबाबत आम्ही तडजोड करणार नाही. मात्र जे दोन मित्र पक्ष आहेत त्यांना योग्य वाटा मिळेल. हा वाटा मिळाला आहे यात शंकाच नाही, मात्र भाजपाने त्यांचा शब्द खरा केला आहे. मंत्रिमंडळ विस्तार झाला मात्र भाजपाने त्यांचं वर्चस्व कायम ठेवलं आहे आणि आपणच मोठा भाऊ आहोत हे दाखवून दिलं आहे.

### भाजपा आणि शिवसेनेत संघर्ष

भाजपा शिवसेनेत मुख्यमंत्री पद आणि खातेवाटप यावरुन काहीसा संघर्ष झाला याचं एक कारण ठरलं ते म्हणजे अजित पवारांनी मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांना पाठिंबा जाहीर केला. अजित पवार हे अर्थखात्यासाठी आग्रही होते. तसंच त्यांना आणखी काही मंत्रिपदं हवी होती जसं की कृषी, महिला आणि बाल कल्याण ही खाती ते आपल्याकडे ठेवण्यात यशस्वी झाले. नोव्हेंबर महिन्यात विधानसभेची निवडणूक पार पडली.

---

# गृहमंत्री अमित शहा यांनी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा

## पिंपरी चिंचवड शहर काँग्रेसकडून मागणी

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी देशाचे गृहमंत्री अमित शाह यांनी भर संसदेत आक्षेपार्ह विधान करून त्यांचा घोर अपमान केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी केलेल्या विधानावरून काँग्रेस पक्षाने गृहमंत्री अमित शाह यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी केलेली आहे. याअनुषंगाने आज मंगळवार दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक चौक, पिंपरी येथे पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) कॉंग्रेस कमिटीच्या वतीने शहराध्यक्ष डॉ.कैलास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली गृहमंत्री अमित शाह यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची मागणी करत निषेध आंदोलन करण्यात आले. तसेच याबाबतचे निवेदन पिंपरी चिंचवडचे अप्पर तहसीलदार देशमुख यांना देण्यात आले. त्याप्रसंगी ज्येष्ठ नेत्या शामलाताई सोनावणे, भाऊसाहेब मुगुटमल, माजी नगरसेवक तुकाराम भोंडवे, पर्यावरण विभाग महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस अमरसिंग नाणेकर, सामाजिक न्याय विभाग प्रदेश उपाध्यक्ष वाहब शेख, चिंचवड ब्लॉक अध्यक्ष ज्ञानेश्वर मलशेट्टी, पिंपरी ब्लॉक अध्यक्ष विश्वनाथ जगताप,




भोसरी ब्लॉक अध्यक्ष विठ्ठल शिंदे, सेवादल अध्यक्ष प्रा. अ‍ॅड. किरण खाजेकर, ओबीसी सेल अध्यक्ष सोमनाथ शेळके, अल्पसंख्यांक विभाग अध्यक्ष शहाबुद्दीन शेख, अनुसूचित जाती विभाग अध्यक्ष हिरामण खवळे, व्यापारी सेल अध्यक्ष अमरजितसिंग पाथीवाल, अ‍ॅड. अशोक धायगुडे, आदी काँग्रेस पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# चाकणमधून बांगलादेशी दांम्पत्यास अटक!

## बनावट कागदपत्रांद्वारे काढले आधार आणि मतदान कार्ड

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बनावट कागदपत्रांच्या आधारे आधार कार्ड आणि मतदान कार्ड काढून भारतात अवैधरित्या राहणाऱ्या बांगलादेशी दांपत्याला चाकण पोलिसांनी अटक केली. टिंकु चौधरी (वय ३१, आधार कार्ड नं. ५४८१३१५३९६४८) व खादिजा खातुन (वय २४, मतदान कार्ड क्रमांक SWD8771297, दोघेही रा. साईराज लॉजिंग, आळंदीफाटा, मेदनकरवाडी, ता. खेड, जि. पुणे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.**




सोमवारी (दि. २३) चाकण पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी गस्त घालत होते. त्यावेळी दहशतवाद विरोधी पथकातील (अढउ) पोलीस हवालदार सुनील शिंदे यांना गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाली की, आळंदी फाटा येथील साईराज लॉजिंगमध्ये बांग्लादेशी दांपत्य सफाई कामगार म्हणून काम करत आहेत. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने पंचासमक्ष खात्री केली असता दोघेजण मिळून आले. त्यांच्याकडे असलेल्या ओळख पत्रांची पडताळणी केली असता ही ओळखपत्रे बनावट असल्याचे दिसून आले. आरोपी दांपत्याने त्यांचे मुळ वास्तव्याचे ठिकाण छालचुरा, पोस्ट रानटिया, जिनेगती थाना, जिल्हा शेरपुर, राज्य ढाका, देश बांग्लादेश असल्याचे सांगितले. त्यानुसार त्या दांपत्यावर गुन्हा दाखल केला आहे ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सह आयुक्त शशिंकात महावरकर, अपर आयुक्त, वसंत परदेशी, उपायुक्त विवेक पाटील, शिवाजी पवार, सहायक आयुक्त, राजेंद्रसिंह गौर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक प्रमोद वाघ, निरीक्षक नाथा घार्गे, सहायक निरीक्षक प्रसंन्न ज-हाड, गणपत धायगुडे, उपनिरीक्षक नामदेव तलवाडे, पोलीस हवालदार सुनील शिंदे, शिवाजी चव्हाण, हनुमंत कांबळे, भैरोबा यादव, राजू जाधव, रेवणनाथ खेडकर, सुनील भागवत, शरद खैरनार, किरण घोडके, उध्दव गर्जे, उषा होले, सरला ताजणे यांच्या पथकाने केली.

### दांपत्यावर गुन्हा दाखल

ओळख पत्रांची पडताळणी केली असता ही ओळखपत्रे बनावट असल्याचे दिसून आले. आरोपी दांपत्याने त्यांचे मुळ वास्तव्याचे ठिकाण छालचुरा, पोस्ट रानटिया, जिनेगती थाना, जिल्हा शेरपुर, राज्य ढाका, देश बांग्लादेश असल्याचे सांगितले. त्यानुसार त्या दांपत्यावर गुन्हा दाखल केला.

# पुण्यासाठी दोन महापालिका आवश्यक

## उशीर चालणार नसल्याची चंद्रकांत पाटील यांची भूमिका

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'शहराच्या वाढत्या भौगोलिक क्षेत्राचा विचार करता शहरासाठी दोन महापालिका कराव्या लागतील. दोन स्वतंत्र महापालिका करण्यासाठी उशीर चालणार नाही. कटक मंडळांच्या विलीनीकरणाबाबतही तातडीने निर्णय घ्यावा लागेल,' अशी स्पष्ट भूमिका राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी मांडली. जानेवारी महिन्यापासून सरकारचे कामकाज नियमित सुरू होईल.**

असेही ते म्हणाले.पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने नवनिर्वाचित आमदार आणि मंत्र्यांसमवेत 'शहर विकासाची २५ वर्षे' या विषयावर वार्तालाप आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते.'समाविष्ट गावे आणि वाढत्या लोकसंख्येमुळे महापालिकेवर ताण येत आहे. त्यामुळे पुण्यासाठी पूर्व आणि पश्चिम अशा दोन स्वतंत्र महापालिका कराव्या लागतील,' असा मुद्दा राष्ट्रवादी काँग्रेसचे हडपसर विधानसभा मतदारंसघाचे आमदार चेतन तुपे यांनी मांडला. हा धागा पकडून चंद्रकांत पाटील यांनी स्वतंत्र महापालिकेची आवश्यकता अधोरेखित केली.'शहरामध्ये केवळ एक महापालिका असून चालणार नाही. राजकीय, सामाजिक आणि भौगोलिक असे अनेक विषय गुंतले आहेत. त्याचा



विचार करून शहराचे काही भाग करावे लागतील.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) शहरात असले, तरी ती महापालिका नाही. त्यामुळे दोन स्वतंत्र महापालिका करण्यासाठी आता उशीर करून चालणार नाही,' असे पाटील यांनी स्पष्ट केले. पाटील म्हणाले, 'महापालिकेचे विभाजन होणे गरजेचे आहे. त्यामुळे या संदर्भात व्यापक चर्चा करावी लागेल. नावांचा प्रश्नही अशा वेळी महत्त्वाचा ठरतो. त्यातही पुणे शहराला एक इतिहास आहे. त्यामुळे महापालिका करताना पुणे नावाचा समावेश असावा, याबाबत सगळेच आग्रही असतील. मात्र, अशा गोष्टींवर साधकबाधक चर्चा करून विभाजनाचा निर्णय घेतला जाईल. राज्यात महायुतीला बहुमत मिळाले आहे. मंत्र्यांचे खातेवाटपही झाले आहे. त्यानुसार जानेवारी महिन्यापासून सरकारचे कामकाज नियमितपणे सुरू होईल. त्यावेळी हे विषय प्राधान्याने घेतले जातील. महापालिकेची निवडणूक एप्रिल-मे महिन्यात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा विषयांना उशीर करून चालणार नाही.'पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने नवनिर्वाचित आमदार आणि मंत्र्यांसमवेत 'शहर विकासाची २५ वर्षे' या विषयावर वार्तालाप आयोजित करण्यात आला होता.'समाविष्ट गावे आणि वाढत्या लोकसंख्येमुळे महापालिकेवर ताण येत आहे. त्यामुळे पुण्यासाठी पूर्व आणि पश्चिम अशा दोन स्वतंत्र महापालिका कराव्या लागतील.

### 'महापालिकेचे विभाजन होणे गरजेचे

हा धागा पकडून चंद्रकांत पाटील यांनी स्वतंत्र महापालिकेची आवश्यकता अधोरेखित केली.'शहरामध्ये केवळ एक महापालिका असून चालणार नाही. राजकीय, सामाजिक आणि भौगोलिक असे अनेक विषय गुंतले आहेत. त्याचा विचार करून शहराचे काही भाग करावे लागतील. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) शहरात असले, तरी ती महापालिका नाही. त्यामुळे दोन स्वतंत्र महापालिका करण्यासाठी आता उशीर करून चालणार नाही,' असे पाटील यांनी स्पष्ट केले. पाटील म्हणाले, 'महापालिकेचे विभाजन होणे गरजेचे आहे. त्यामुळे या संदर्भात व्यापक चर्चा करावी लागेल. नावांचा प्रश्नही अशा वेळी महत्त्वाचा ठरतो.


## स्मशानभूमीमध्ये आता पर्यावरणपूरक

# वायू प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविणार !

### आयुक्तांची स्थायी समिती सभेत मान्यता

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहरातील वायु प्रदूषणाचा मुद्दा सध्या ऐरणीवर आलेला आहे. शहरातील स्मशानभूमींमध्ये अंत्यविधीसाठी लाकडाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. यामुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होतो. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी तसेच झाडे वाचवण्यासाठी स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी विद्युतदाहिनीचा वापर करण्यास प्राधान्य दिले जात आहे. त्यानुषंगाने चऱ्होली येथील स्मशानभूमीत विद्युतदाहिनी बसविण्यात येणार असून त्यासाठी येणाऱ्या खर्चास स्थायी समिती सभेत प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.**





#### अशी असेल वायू प्रदूषण नियंत्रण यंत्रणा

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने बोपखेल येथील स्मशानभूमीत आणि ई क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील स्मशानभूमीत पर्यावरणपूरक वायू प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यात येणार आहे. परिसरातील नागरिकांना तसेच अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना धुराचा त्रास होऊ नये यासाठी पर्यावरणपूरक वायू प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविण्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी आज झालेल्या बैठकीत मान्यता दिली. शहरातील स्मशानभूमीमध्ये टप्प्याटप्प्याने विद्युतदाहिनी बसविण्यात येणार आहे.

### 16शाळांमध्ये झिरो वेस्ट प्रकल्प

महापालिकेच्या १०५ शाळांपैकी मे. आसरा फाउंडेशन या संस्थेला झिरो वेस्ट (शून्य कचरा) शाळा उपक्रम राबविण्यासाठी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील ८ शाळा प्रायोगिक तत्वावर देण्यात आल्या होत्या. त्यानुसार पहिल्या टप्प्यात ८ शाळा, दुसऱ्या टप्प्यात १६ शाळा, तिसऱ्या टप्प्यात १६ शाळा , चौथ्या टप्प्यात १६ शाळा यानुसार १०५ शाळांपैकी ५६ शाळा झिरो वेस्ट (शून्य कचरा) करण्यात आला आहेत. यापुढे शून्य कचरा प्रकल्प राबविण्यासाठी पुढील १६ शाळांची निवड करण्यात आली असून यामध्ये अ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील निगडी येथील विद्यानिकेतन मुलांची व मुलींची शाळा, ब क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील काळेवाडी मुलांची व मुलींची शाळा, क क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील खराळवाडी येथील उर्दू शाळा, जाधववाडी येथील उर्दू प्राथमिक शाळा, ड क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील कस्पटे वस्ती शाळा, ई क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील भोसरी येथील मुलांची व मुलींची शाळा, फ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील निगडी येथील मुलांची व मुलींची शाळा, ग क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील खिवंसरा पाटील मुलींची शाळा, कर्मवीर भाऊराव पाटील शाळा, थेरगाव उर्दू शाळा, ह क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील छत्रपती शाहू महाराज प्राथमिक शाळा, संत तुकाराम नगर प्राथमिक शाळा या शाळांचा समावेश असून या शाळेमध्ये झिरो वेस्ट प्रकल्प राबविण्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

---

## कंपनी, शॉपलगत रस्त्यांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवा

### लघुउद्योग संघटनेचे आवाहन; औद्योगिक आस्थापनांना पत्रकाद्वारे दिल्या स्पष्ट सुचना

। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**औद्योगिक परिसरातील चोऱ्या तसेच इतर घातपाती कारवाया रोखण्यासाठी आता कंपनी, शॉपलगतच्या परिसरातील रस्तेही कव्हर होतील, या पद्धतीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवले जाणार आहेत. पोलीसांनी केलेल्या सुचनांनुसार, पिंपरी - चिंचवड लघुउद्योग संघटनेने पिंपरी - चिंचवड औद्योगिक परिसरातील सर्व कंपन्या, शॉप व इतर औद्योगिक आस्थापनांना याबाबत पत्रकाद्वारे स्पष्ट सुचना देण्यात आल्या आहेत.**



भोसरी एमआयडीसीतील एस, जे, डब्ल्यू आणि टी ब्लॉक, पिंपरीतील एफ २, एच ब्लॉक, चिंचवड मधील डी १, डी २ आणि डी ३ हे सर्व ब्लॉक तसेच, भोसरी औद्योगिक परिसरातील सेक्टर ७ आणि १०, शांतीनगर, चिखली, कुदळवाडी, तळवडे, ज्योतिबानगर, शेलारवस्ती-चिखली, चोविसावाडी-चऱ्होली, बारणेवस्ती-मोशी असा प्रचंड मोठ्या प्रमाणात पिंपरी - चिंचवड शहरातील औद्योगिक पट्टा विस्तारलेला आहे. या औद्योगिक परिसरातील बहूतांशी कंपन्यांमध्ये सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. परंतु, हे कॅमेरे कंपन्यांच्या आतील बाजूस असतात. कंपनीलगतचे मुख्य, अंतर्गत रस्तेही त्या कॅमेऱ्यांमध्ये येणे गरजेचे असते. अनेकदा अपघात, घातपाताचे प्रकार घडतात. याशिवाय कंपनीतून घरी सुटल्यानंतर कामगारांकडील मोबाईल फोन, पगाराची रोकड लुटून नेण्याचे प्रकारही सातत्याने घडतात. मात्र, घटनास्थळावरील कंपन्यांमध्ये रस्त्याच्या बाजूला सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याचे अनेकदा निदर्शनास येते. त्यामुळे आरोपींचा माग काढणे पोलीसांनाही कठीण होते. ही बाब लक्षात घेऊन भोसरी एमआयडीसी पोलीसांनी लघुउद्योग संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत नुकतीच बैठक घेतली. औद्योगिक परिसरातील गुन्हे रोखण्यासाठी कंपनी, शॉपसमोरील परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. तसेच, आपल्या आस्थापनेसमोरील रस्तेही कव्हर होतील, अशा प्रकारे चांगल्या प्रतीचे कॅमेरे बसवावेत, अशा सुचना करण्यात आल्या. त्या अनुषंगाने लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे यांनी पत्रक प्रसिद्धीस दिले आहे. औद्योगिक परिसरामध्ये चोऱ्या, गुन्हे तसेच दहशतवादी कारवाया, समाज कंटकाकडून घातपाती कृत्ये घडू नये याकरिता सुरक्षिततेच्या व कायदा - सुव्यवस्थेच्या अनुषंगाने औद्योगिक आस्थापना, कंपनी, शॉपसमोरील परिसर व रस्ते कव्हर होतील, अशा प्रकारे चांगल्या प्रतीचे सीसीटीव्ही कॅमेरे किमान ३० दिवसापर्यंत स्टोअरेज क्षमतेसह बसविण्यात यावे, सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्या पूर्वीचे व बसविल्यानंतरचे फोटो काढून जुन्या व नवीन बसविण्यात आलेल्या कॅमेऱ्यांच्या माहितीसह भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यातील संतोष फावडे (९९२३१२४१०५) व लघुउद्योग संघटनेचे औटी (९८८१४५०२२५) यांना कळविण्यात यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

> "भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात लघुउद्योग संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत नुकतीच बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत पोलीस अधिकाऱ्यांनी औद्योगिक परिसरातील चोऱ्या तसेच इतर घातपाती कारवाया रोखण्यासाठी कंपनी,शॉपसमोरील परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. तसेच,आपल्या आस्थापनेसमोरील रस्तेही कव्हर होतील, अशा प्रकारे चांगल्या प्रतीचे कॅमेरे बसवावेत, अशा सुचना केल्या होत्या. त्या अनुषंगाने शहरातील सर्व कंपन्या व लघुउद्योजकांना सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याबाबत सुचना करण्यात आल्या आहेत."
>
> **-संदीप बेलसरे,** (अध्यक्ष - पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटना)

> **पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील आस्थापना, कंपन्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत वरिष्ठांकडून वेळोवेळी सुचना दिल्या जातात. पिंपरी - चिंचवड औद्योगिक परिसरात कारखाने तसेच लघुउद्योगही मोठ्या प्रमाणात आहेत. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून औद्योगिक परिसरातील कंपनी, शॉपमध्ये सीसीटीव्ही असणे उद्योजकांच्या दृष्टीने फायद्याचे आहे. तसेच, एखादा गुन्हा घडल्यास सीसीटीव्हीमुळे आरोपींचा तपास करताना पोलीसांनाही मोठी मदत होते. त्यामुळे लघुउद्योग संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे."**
>
> **-गणेश जामदार, (वरिष्ठ पोलीस निरीक्षक - भोसरी एमआयडीसी)**



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**प्रचंड बहुमत घेऊन 'महायुती' चे सरकार महाराष्ट्रात सत्तेवर आले. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार उपमुख्यमंत्री झाले ! आता, सगळे काही सुरळीत होणार असे वाटत असतानाच मिठाचा खडा पडला, आणि मंत्रीपद न मिळालेल्या असंतुष्टांनी डोके वर काढले. भाजपाचे सुधीर मुनगंटीवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे छगन भुजबळ आणि शिवसेनेचे विजय शिवतारे, प्रकाश सुर्वे हे या असंतुष्टांमधील काही मोठे नेते ! सर्वांना या ना त्या प्रकारे गप्प करण्यात यश आले. पण, गप्प बसणार ते छगन भुजबळ कसले ? छगन भुजबळांनी आपला बंडखोरीचा पवित्रा कायम ठेवला आणि दररोज नवनवीन बाऊन्सर्स टाकून 'महायुती' च्या नेत्यांना घायाळ करून टाकले.**

# बंडखोर भुजबळांच्या जबरदस्त बाऊन्सर्सनी 'महायुती' घायाळ !



भुजबळ यांनी प्रथम आपल्या ओबीसी कार्यकर्त्यांचा मेळावा घेतला. त्यांना मार्गदर्शन करून आपल्या बंडखोरीचे खरे कारण सांगितले. पण, त्यांच्या पक्षाचे नेते अजित पवार त्यांना फारसे महत्त्व देत नाहीत, हे लक्षात येताच त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्यासमोर नाराजीचा पाढा वाचला. त्यांच्यामधील चर्चा ही गुलदस्त्यात झाली असली तरी त्यावर आठ दिवसात तोडगा काढण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिल्यामुळे सध्या तरी भुजबळ शांत आहेत. कदाचित आगामी दोन-तीन दिवसात अजित पवार, सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल हे छगन भुजबळ यांची समजूत काढतीलही.. पण, सध्या त्यांच्या आरोपांमुळे कलुषित झालेले वातावरण निवळणार कसे, हा खरा प्रश्न आहे ! प्रचंड बहुमत असताना सरकार स्थापन करण्यात दिरंगाई, त्यानंतर मंत्रिमंडळ शपथविधीला दिरंगाई आणि नंतर मंत्र्यांच्या खातेवाटपाला उशीर, याचे कारण पुढे येत नसले तरी त्यातील एक मुद्दा हा भुजबळांची नाराजी असणार, हे मात्र नक्की आहे.

## भुजबळांची बंडखोरी नवी नाही

वास्तविक, भुजबळ ज्या ज्या पक्षांमध्ये होते, तेथील नेत्यांच्या विरोधात त्यांनी नेहमीच आवाज उठवला आहे, बंडखोरीची भाषा केली आहे. ते शिवसेनेत होते, त्या काळात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विरोधात बोलणे किंवा पाऊल उचलणे हे फक्त अवघड नव्हते तर अशक्य होते.. त्या काळात भुजबळांनी शिवसेना सोडून बंद केले होते. त्यानंतर काँग्रेसमधून बाहेर पडून शरद पवार यांच्याबरोबर ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. त्यांनी समता परिषद म्हणजे ओबीसींची संघटना स्थापन करून आपली ताकद वेळोवेळी दाखवून दिली आहे. अर्थात् त्याचे त्यांना फळही मिळाले आहे. भुजबळ उपमुख्यमंत्री झाले, गृहमंत्री झाले. पण, तेवढ्यावर ते कधीच समाधानी नव्हते.मधल्या काळात अब्दुल करीम तेलगी याचा स्टॅम्प घोटाळा, दिल्लीतला महाराष्ट्र सदनाचा घोटाळा आणि अन्य काही घोटाळ्यांमध्ये भुजबळांचे नाव आले, त्यांनी तुरुंगवासही भोगला. पण, स्पष्ट बोलणे, कोणाचाही मुलाहिजा न ठेवता बिनधास्त बोलणे ही त्यांची जुनीच सवय किंवा खोड ! त्यामुळे त्यांच्या घरात खासदारकी, आमदारकी कायम राहिली त्यांचा पुतण्या आणि मुलगा सुद्धा राजकारणात आला. थोडक्यात काय, राजकारणातील सर्व फायदे त्यांनी छानपैकी उपभोगले आहेत. म्हणून त्यांनी केलेली बंडखोरी म्हणजे एक नाटक तर नाही ना? आपले महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांनी आडमुठी भूमिका स्वीकारली नाही ना, अशी शंका येऊन जाते.

## बंडखोर व्यक्तिमत्त्वाची वाटचाल

छगन भुजबळ यांची पार्श्वभूमी तपासून पाहताना आज आठवण येते ती डिसेंबर १९९१ ची ! नागपूर येथे हिवाळी अधिवेशन चालू होते. तेव्हा अर्थातच काँग्रेस सत्तेवर होती. शिवसेनेचे नेते मनोहर जोशी यांची विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून निवड झाली. अर्थात्च बाळासाहेब ठाकरे यांनी ही निवड केली असणार! छगन भुजबळ यांना बंडखोरीसाठी काहीतरी कारण हवे असणार आणि नेमकी त्यांना हीच संधी मिळाली असावी. त्यांची मानसिकता व अस्वस्थता शरद पवार यांनी हेरली आणि त्यांना शिवसेनेत बंड करून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवला. शिवसेनेत सतत आक्रमक राहून, पक्ष वाढवून डावलले जाते ही खंत व्यक्त करत त्यांनी शड्डू ठोकला. दुसरीकडे शरद पवारांसारखा दिग्गज नेता आपल्या पाठीशी उभा. मग काय, त्यांनी शिवसेनाप्रमुखांच्या विरोधातच बंडाचा झेंडा फडकवला, शिवसेना सोडली ! तेव्हा शिवसेनेचा जबरदस्त दबदबा होता. शिवसेनाप्रमुखांना आव्हान देणे सोपे नव्हते. शिवसैनिकांचा रोष काय असतो हे भुजबळांना चांगले ठाऊक होते. बारा आमदारांना आपल्या बंडात बरोबर घेण्याची त्यांची तयारी झाली. सभागृहातून भुजबळ हे त्यांच्या साथीदार आमदारांसह अचानक बेपत्ता झाले. या बंडाने शिवसेनाप्रमुखही जाम भडकले होते. शिवसेनेत बंड करून आणि शिवसेनाप्रमुखांना आव्हान देऊन मुंबईत राहणे हे सोपे नाही, हे सर्वांनाच ठाऊक होते. एकदा तरी बाळासाहेबांनी मला छगन म्हणून हाक मारावी असे स्वत: भुजबळ काकुळतीला येऊन सांगत होते, पण शिवसेनाप्रमुखांनी त्यांचा फोनही घेतला नाही आणि त्यांच्याशी शब्दही बोलले नाहीत.

त्यानंतर मात्र काँग्रेस आणि शरद पवारांचे आशीर्वाद याशिवाय त्यांच्यापुढे कोणताच पर्याय उरला नाही. पुढे शिवसेनाप्रमुखांनी त्यांना लखोबा लोखंडे म्हणून कायमचे संबोधले. पण, काँग्रेसने मंत्रीपदाची ताकद दिल्यावर भुजबळही शिवसेनाप्रमुखांना टी. बाळू असे उपहासात्मक बोलू लागले. ज्यांनी त्यांना दोन वेळा महापौर, आमदार केले त्यांच्याशीच भुजबळांनी पंगा घेतला होता. आज तब्बल ३३ वर्षांनंतर हेच भुजबळ "जहाँ नही चैना, वहाँ नही रहेना "असा सूर आळवत आहेत. तेव्हा बाळासाहेब ठाकरेंच्या विरोधात आणि आज अजित पवारांच्या विरोधात ते तोफा डागत आहेत. तेव्हा विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद मिळाले नाही म्हणून आणि आता फडणवीस सरकारमध्ये मंत्रीपद मिळाले नाही म्हणून ते आक्रोश करीत आहेत. पूर्वी त्यांनी बंड केले, तेव्हा शरद पवारांची ताकद त्यांच्या पाठीशी होती, हे लक्षात घ्यायला हवे.. आणि आता ?

## दादांची ताकद आणि भाजपाचे कवच

आता दीड वर्षांपूर्वीचा काळ पाहू या.. जुलै २०२३ मध्ये राष्ट्रवादीमध्ये शरद पवारांच्या नेतृत्वालाच त्यांनी आव्हान दिले, तेव्हा अजितदादांचे वलय आणि भाजपाचे संरक्षक कवच त्यांच्याबरोबर होते. पण आता काय? आता भुजबळांनी अजितदादांच्याच विरोधात बंडाचा झेंडा फडकवला आहे खरा..त्यांच्या पाठीशी नेमके कोण आहे, हे गूढ आहे. भुजबळांना मंत्री करावे, म्हणून स्वत: देवेंद्र फडणवीस आग्रही होते,असे ते वारंवार सांगत आहेत. तसेच हम एक है,तो सेफ हैं, अशी पंतप्रधान नरेंद्र मोदींची निवडणुकीतील आवडती घोषणा देत आहेत. त्यांना भविष्यात कोणाकडून काय मिळेल, त्यांची कितपत कदर केली जाईल, हे माहीत नाही, पण अजितदादांसाठी ते मात्र डोकेदुखी होऊन बसले आहेत.

छगन भुजबळ यांनी पंच्याहत्तरी ओलांडली असून गेल्या पन्नास वर्षांच्या त्यांच्या राजकीय जीवनातील हे त्यांचे तिसरे बंड आहे. त्यांच्या मनाविरुद्ध ज्या ज्या वेळी काही तरी घडते किंवा त्यांना पाहिजे ते मिळत नाही, तेव्हा ते ओबीसींची म्हणजेच समता परिषदेची ढाल पुढे करतात, हा इतिहास सर्वांनाच माहीत झाला आहे. १९७३ मध्ये ते मुंबई महापालिकेत शिवसेनेचे नगरसेवक झाले, १९८५ मध्ये ते माझगावमधून आमदार म्हणून निवडून आले. माझगावमधून दोन वेळा आमदार झाले, दोन वेळा महापौर झाले. पण ते शिवसेनाप्रमुखांचे होऊ शकले नाहीत. मनोहर जोशींना विधानसभेचे विरोधी पक्ष नेतेपदी नेमल्याने त्यांचे बिनसले. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमध्ये राष्ट्रवादीच्या नऊ मंत्र्यांना संधी मिळाली. पण, त्यात भुजबळ यांचे नाव नाही, त्यानंतर भुजबळांचा संताप सुरू झाला.

आठवा जरा, शरद पवारांच्या पक्षात भुजबळांना खूप महत्त्व दिले गेले. प्रदेशाध्यक्ष, उपमुख्यमंत्रीपद त्यांना मिळाले. ओबीसी नेता म्हणत ते नेहमीच वलंयाकित राहिले. पण मनी लाँड्रिंगच्या आरोपावरून ईडीकडून झालेली चौकशी, दोन वर्षे जेल आठवते का ? भुजबळ हे भाजपाच्या रडारावर अनेक वर्षे होते. त्यांचा पुतण्या समीरने बंडखोरी करून एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या सुहास कांदे या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात निवडणूक लढवली तेव्हापासून शिवसेनाही भुजबळांवर नाराज आहे. त्यांचा संताप त्यांच्या समर्थकांमध्ये पोहोचल्यावर त्यांचा राग अजितदादांवर निघाला. काही ठिकाणी तर अजितदादांच्या फोटोला जोडो मारो आंदोलन झाले. मंत्रीपद मिळाले नाही म्हणून असे आंदोलन प्रथमच महाराष्ट्राला बघायला मिळाले असावे.

मला मंत्रीपदाची हाव नाही, रास्ता मेरा है, मी रस्त्यावर लढाई लढणार, असे ते म्हणत आहेत. कोणाच्या विरोधात व काय पाहिजे म्हणून ते लढणार आहेत? आपल्याला मंत्री करा असे प्रफुल पटेल, देवेंद्र फडणवीस यांनीही सांगितले होते, मग का केले नाही, असा प्रश्न त्यांना पडला आहे. पण आता भुजबळ काय करणार? जाणार कुठे? ओबीसींचा एल्गार पुकारण्याची भाषा करतात, मराठा नेते मनोज जरांगेंना अंगावर घेतल्याचे बक्षीस मिळाल्याचे सांगतात. आपण कोणत्याही दबावाला बळी पडणार नाही, पुढे आणखी संकटे येतील, तुम्ही हिम्मत ठेवा असे ओबीसी समाजाला आवाहन करतात, त्यांच्या मनात काय ते समजतच नाही. पूर्वीचे एक ठीक होते. पण,आज भुजबळांच्या बरोबर कोण आहे ? या वयात लढण्याची त्यांची ऊर्मी असली तरी ते कोणाविरोधात लढणार ? सत्तेला लाथ मारून ते बाहेर जातील का ? ज्या भाजपाने त्यांच्यावर ढीगभर भ्रष्टाचाराचे आरोप केले, तो पक्ष त्यांना जवळ घेईल का? समाजासाठी नव्हे, तर स्वत:ला मंत्रीपद मिळाले नाही,म्हणून ते टाहो फोडत आहेत, हे जनतेला कळत नाही, असा त्यांचा समज आहे का ?

शेवटी काय भुजबळ हे तर मैदानात उतरले आहेत, नेहमीप्रमाणे आपल्याच नेतृत्वाला ते आव्हान देत आहेत. पण, पंच्याहत्तरी ओलांडल्यानंतर पूर्वीची ताकद आणि तो जोश त्यांच्यात राहील का ? पक्षातून बाहेर पडायचे म्हटल्यास जाणार कोठे ? राजकारणातल्या या सर्कशीतला एक झोपाळा सोडला तर समोर पकडण्यासारखा दुसरा झोपाळा आहे का.. त्यांच्यासमोर तो झोपाळा भाजपचा असला तरी त्यांना भाजपा जवळ घेईल का? हे सगळे प्रश्न आज उभे आहेत. यावर काय मार्ग निघेल माहित नाही, पण सध्या तरी भुजबळांच्या जबरदस्त बाऊन्सर्सनी 'महायुती' ला मात्र घायाळ केले आहे, हे सांगण्यासाठी कोणाची गरज नाही !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अजित पवार भुजबळांना भेटत नाहीत!

## मंत्रिमंडळातून अनेक दिग्गज नेत्यांना डावलले

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात महायुतीचं सरकार स्थापन होऊन आज जवळपास २० दिवस झाले आहेत. मात्र, तरीही महायुतीमधील काही नेत्यांमध्ये अद्यापही रुसवे-फुगवे सुरु असल्याचं पाहायला मिळत आहे. कारण महायुती सरकारच्या मंत्रिमंडळातून अनेक दिग्गज नेत्यांना डावलण्यात आलं आहे.**



यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनाही मंत्रिमंडळात स्थान देण्यात आलेलं नाही. त्यामुळे छगन भुजबळ नाराज असून त्यांनी आपली नाराजी जाहीरपणे बोलून दाखवली. एवढंच नाही तर मंत्रिपद न मिळाल्यानंतर छगन भुजबळांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर अप्रत्यक्ष टीका करत नाराजीही व्यक्त केली. त्यानंतर जहाँ नहीं चैना, वहा नहीं रहना, असं सूचक विधानही भुजबळांनी केलं होतं. त्यामुळे छगन भुजबळ हे काही मोठा निर्णय घेतात का? याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लावले जात आहेत. अशातच छगन भुजबळ यांनी सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेत तब्बल अर्धा तास चर्चा केली. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. या भेटीत काय चर्चा झाली? काही राजकीय चर्चा झाली का? याबाबत आता तर्कवितर्क लावले जात आहेत. मात्र, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळ यांच्या भेटीवर राजकीय नेत्यांकडून प्रतिक्रिया येत आहेत. आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी भुजबळांच्या नाराजीवर भाष्य करत काही सवाल उपस्थित केले आहेत. “भुजबळ फडणवीसांना भेटायला जातात, पण अजित पवार भुजबळांना भेटत नाहीत, याचा अर्थ काय?”, असा सवाल अंबादास दानवे यांनी उपस्थित केला आहे.छगन भुजबळ हे अजित पवार यांच्यावर नाराज आहेत. मग भुजबळ हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटतात. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार हे छगन भुजबळ यांना भेटत नाहीत. मग यामधून राजकीय अर्थ काय घ्यायचा? आता मागच्या काही काळात असं म्हटलं जात होतं की, देवेंद्र फडणवीस यांनीच छगन भुजबळ यांना आंदोलने करायला लावले. आता ते सत्य होतं, हे समोर येत आहे. न जाणो, छगन भुजबळ आणखी काही पावलं उचलतील. असं एका दिवसांत कोणती पावलं उचलता येत नसतात. त्यासाठी थोडं थांबावं लागतं. आणखी ८ दिवस, १० दिवस किंवा एक महिना. सर्व गोष्टी एका क्षणात स्पष्ट होत नसतात?”, असं सूचक भाष्य अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना केलं.छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोमवारी भेट घेतली. त्या भेटीनंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं. तसेच याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना प्रश्न विचारण्यात आला असता अजित पवार म्हणाले की, “आमचा हा पक्षांतर्गतला प्रश्न आहे. आम्ही आमच्या पद्धतीने सोडवू”, अशी एका वाक्यात प्रतिक्रिया अजित पवारांनी दिली होती.यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनाही मंत्रिमंडळात स्थान देण्यात आलेलं नाही. भुजबळ नाराज असून त्यांनी आपली नाराजी जाहीरपणे बोलून दाखवली. एवढंच नाही तर मंत्रिपद न मिळाल्यानंतर छगन भुजबळांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर अप्रत्यक्ष टीका करत नाराजीही व्यक्त केली. त्यानंतर जहाँ नहीं चैना, वहा नहीं रहना, असं सूचक विधानही भुजबळांनी केलं होतं. त्यामुळे छगन भुजबळ हे काही मोठा निर्णय घेतात का? याबाबत राजकीय वर्तुळात तर्कवितर्क लावले जात आहेत. अशातच छगन भुजबळ यांनी सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेत तब्बल अर्धा तास चर्चा केली. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या. या भेटीत काय चर्चा झाली? काही राजकीय चर्चा झाली का? याबाबत आता तर्कवितर्क लावले जात आहेत. मात्र, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि छगन भुजबळ यांच्या भेटीवर राजकीय नेत्यांकडून प्रतिक्रिया येत आहेत. आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी भुजबळांच्या नाराजीवर भाष्य करत काही सवाल उपस्थित केले आहेत. “भुजबळ फडणवीसांना भेटायला जातात, पण अजित पवार भुजबळांना भेटत नाहीत, याचा अर्थ काय?”, असा सवाल अंबादास दानवे यांनी उपस्थित केला आहे.छगन भुजबळ हे अजित पवार यांच्यावर नाराज आहेत. मग भुजबळ हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटतात.

### राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार हे छगन भुजबळ यांना भेटत नाहीत. मग यामधून राजकीय अर्थ काय घ्यायचा? आता मागच्या काही काळात असं म्हटलं जात होतं की, देवेंद्र फडणवीस यांनीच छगन भुजबळ यांना आंदोलने करायला लावले. आता ते सत्य होतं, हे समोर येत आहे. न जाणो, छगन भुजबळ आणखी काही पावलं उचलतील. असं एका दिवसांत कोणती पावलं उचलता येत नसतात. त्यासाठी थोडं थांबावं लागतं. आणखी ८ दिवस, १० दिवस किंवा एक महिना. सर्व गोष्टी एका क्षणात स्पष्ट होत नसतात?”, असं सूचक भाष्य अंबादास दानवे यांनी माध्यमांशी बोलताना केलं.छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोमवारी भेट घेतली. त्या भेटीनंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं.

# डॉ. आंबेडकरांच्या नावाने राजकारण

## डॉ. बाबासाहेबांच्या स्मृती जपण्याचं काम भाजपाने केलं

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबीयांची चौकशी करण्याकरता काँग्रेस नेते राहुल गांधी काल (२४ डिसेंबर) महाराष्ट्रात आले होते. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर राहुल गांधी यांनी संताप व्यक्त केला. सोमनाथ सूर्यवंशी हे दलित असल्यानेच त्यांची हत्या केल्याचा दावा राहुल गांधींनी केला.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनीही या प्रकरणाचं राजकारण केलं जात असल्याचं म्हटलं. आता त्याही पुढे जाऊन देवेंद्र फडणवीसांनी राहुल गांधींवर निशाणा साधला आहे.

राज्यसभेत अमित शाहांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान केल्याचा दावा करत राहुल गांधी यांनी संसदेत आवाज उठवला होता.तसंच, अनेक काँग्रेस खासदारांनी संसद परिसरात आंदोलनही छेडलं होतं. त्यानंतर सोमनाथ सूर्यवंशींचं हत्याप्रकरण उजेडात आलं. त्यामुळे काँग्रेसने केंद्रात आणि राज्यात आक्रमक भूमिका घेतली. यावरून देवेंद्र फडणवीस म्हणाले, “राहुल गांधी यांनी संसदेचा वेळ खराब केला,



आता जनतेचा वेळ खराब करत आहेत. संसदेत बोलत असताना मोदींनी काँग्रेस पक्षाला एक्स्पोज केलं, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना, संविधानातील आरक्षणाला पंडित नेहरू, इंदिरा गांधी आणि गांधी घराण्याचा कसा विरोध राहिलाय हे मोदींनी जगासमोर आणलं. त्यामुळे काँग्रेस पक्षाकडून नाटक केलं जात आहे.”काँग्रेसने बाबासाहेब आंबेडकरांना निवडून येऊ दिलं नाही. जिथे त्यांचं महापरिनिर्वाण झालं, त्या इंदू मिल येथे स्मारक व्हावं, याकरता इतके वर्षे आंदलने करावी लागली. पण काँग्रेसने सुईच्या टोकाएवढीही जागा दिली नाही. लंडनमध्ये ज्याठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिकले, ते घर लिलावात निघालं होतं. काँग्रेसच्या सरकारच्या काळात अनेक संघटनांनी मागणी केली की हे घर लिलावात जाऊ देऊ नका. पण आमचं सरकार आल्यानंतर ते घर आम्ही ताब्यात घेतलं.

### फडणवीसांनी गांधींवर निशाणा साधला

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मृती जपण्याचं काम भाजपाने केलं, काँग्रेसला फक्त त्यांच्या नावाने राजकारण करायचं आहे. भारतरत्नही काँग्रेसने बाबासाहेबांना दिलं नाही”, असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले. महायुतीतील अनेक नेत्यांनी प्रतिक्रियाही दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनीही या प्रकरणाचं राजकारण केलं जात असल्याचं म्हटलं. आता त्याही पुढे जाऊन देवेंद्र फडणवीसांनी राहुल गांधींवर निशाणा साधला आहे.तसंच, अनेक काँग्रेस खासदारांनी संसद परिसरात आंदोलनही छेडलं होतं. त्यानंतर सोमनाथ सूर्यवंशींचं हत्याप्रकरण उजेडात आलं.

# निर्मला सीतारमण जीनियस आहेत!

## जीएसटी भरण्यासाठी तुम्हाला तुमचे कपडेही विकावे लागतील!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**नुकत्याच पार पडलेल्या ५५व्या जीएसटी कौन्सिलच्या बैठकीमध्ये GST अर्थात वस्तू व सेवा करासंदर्भात काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. त्यातला एक निर्णय सध्या चर्चेत आला असून त्यानुसार जुन्या गाड्यांच्या विक्रीवर आता १८ टक्के जीएसटी भरावा लागणार आहे. यामध्ये इलेक्ट्रिक वाहनांचाही समावेश आहे. ‘सेकंड हँड’ गाड्यांच्या मार्केटमध्ये या निर्णयामुळे मोठी चर्चा सुरू झाली आहे. यासंदर्भात खोचक पोस्ट करताना सामाजिक कार्यकर्ते व वरीष्ठ वकील प्रशांत भूषण यांनी थेट केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांना लक्ष्य केलं आहे.**



जीएसटी कौन्सिलच्या निर्णयानुसार, एखाद्या वापरलेल्या किंवा सेकंड हँड कारची विक्री करताना त्या कारची मूळ किंमत व पुन्हा विक्री होत असलेली किंमत यातील तफावतीच्या रकमेवर १८ टक्के जीएसटी आकारला जाणार आहे. उदाहरणार्थ १२ लाखांची कार ९ लाखांना विकली जात असले, तर त्यात ३ लाखांवर १८ टक्के जीएसटी आकारला जाईल. शिवाय, ही तफावत जर वजामध्ये असेल, अर्थात विक्री होणारी किंमत मूळ किमतीपेक्षा जास्त असेल तर त्यावर जीएसटी आकारला जाणार नाही, असंही स्पष्ट करण्यात आलं आहे.दरम्यान, जीएसटी कौन्सिलनं घेतलेल्या या निर्णयाबाबत प्रशांत भूषण यांनी केलेली पोस्ट सध्या व्हायरल होत आहे. या पोस्टमध्ये प्रशांत भूषण यांनी उदाहरण देऊन यातून कशा अडचणी निर्माण होऊ शकतात, याबाबत दावा केला आहे. तसेच, त्यासंदर्भात भाष्य करतानाच निर्मला सीतारमण यांना टोलाही लगावला आहे.“निर्मला सीतारमण यांनी सांगितलं की तुमची जुनी कार विकताना तिची मूळ खरेदी किंमत आणि विक्री किंमत यातल्या तफावतीएवढ्या रकमेवरच तुम्हाला १८ टक्के जीएसटी भरावा लागणार आहे. म्हणजे जर तुम्ही १० वर्षांपूर्वी १० लाख रुपयांना एक कार खरेदी केली असेल आणि आता तुम्ही ती १ लाख रुपयांना विकत असाल, तर तुम्हाला तफावतीच्या फक्त ९ लाख रुपये रकमेवर १८ टक्के जीएसटी भरावा लागेल. त्यामुळे तुम्हाला १ लाख रुपयांच्या कार विक्रीसाठी प्रत्यक्षात १ लाख ६२ हजार रुपये जीएसटी भरावा लागेल. हा जीएसटी भरण्यासाठी तुम्हाला तुमचे कपडेही विकावे लागतील! निर्मला सीतारमण या जीनियस आहेत. भर थंडीत लोकांना अंगावरचे कपडे विकायला लावण्याचा मार्ग त्यांनी शोधून काढला आहे”, असं प्रशांत भूषण यांनी या पोस्टमध्ये म्हटलं आहे. दरम्यान, जीएसटीसंदर्भातल्या नियमांमध्ये झालेल्या बदलांवरून देशभरात संमिश्र प्रतिक्रिया उमटताना पाहायला मिळत आहेत.जीएसटी कौन्सिलच्या निर्णयानुसार, एखाद्या वापरलेल्या किंवा सेकंड हँड कारची विक्री करताना त्या कारची मूळ किंमत व पुन्हा विक्री होत असलेली किंमत यातील तफावतीच्या रकमेवर १८ टक्के जीएसटी आकारला जाणार आहे. उदाहरणार्थ १२ लाखांची कार ९ लाखांना विकली जात असले, तर त्यात ३ लाखांवर १८ टक्के जीएसटी आकारला जाईल. शिवाय, ही तफावत जर वजामध्ये असेल, अर्थात विक्री होणारी किंमत मूळ किमतीपेक्षा जास्त असेल तर त्यावर जीएसटी आकारला जाणार नाही, असंही स्पष्ट करण्यात आलं आहे.जीएसटी कौन्सिलच्या निर्णयानुसार, एखाद्या वापरलेल्या किंवा सेकंड हँड कारची विक्री करताना त्या कारची मूळ किंमत व पुन्हा विक्री होत असलेली किंमत यातील तफावतीच्या रकमेवर १८ टक्के जीएसटी आकारला जाणार आहे. उदाहरणार्थ १२ लाखांची कार ९ लाखांना विकली जात असले, तर त्यात ३ लाखांवर १८ टक्के जीएसटी आकारला जाईल. शिवाय, ही तफावत जर वजामध्ये असेल, अर्थात विक्री होणारी किंमत मूळ किमतीपेक्षा जास्त असेल तर त्यावर जीएसटी आकारला जाणार नाही, असंही स्पष्ट करण्यात आलं आहे.दरम्यान, जीएसटी कौन्सिलनं घेतलेल्या या निर्णयाबाबत प्रशांत भूषण यांनी केलेली पोस्ट सध्या व्हायरल होत आहे.

### 18 टक्के जीएसटी भरावा लागणार

या पोस्टमध्ये प्रशांत भूषण यांनी उदाहरण देऊन यातून कशा अडचणी निर्माण होऊ शकतात, याबाबत दावा केला आहे. तसेच, त्यासंदर्भात भाष्य करतानाच निर्मला सीतारमण यांना टोलाही लगावला आहे.“निर्मला सीतारमण यांनी सांगितलं की तुमची जुनी कार विकताना तिची मूळ खरेदी किंमत आणि विक्री किंमत यातल्या तफावतीएवढ्या रकमेवरच तुम्हाला १८ टक्के जीएसटी भरावा लागणार आहे. म्हणजे जर तुम्ही १० वर्षांपूर्वी १० लाख रुपयांना एक कार खरेदी केली असेल आणि आता तुम्ही ती १ लाख रुपयांना विकत असाल, तर तुम्हाला तफावतीच्या फक्त ९ लाख रुपये रकमेवर १८ टक्के जीएसटी भरावा लागेल. त्यामुळे तुम्हाला १ लाख रुपयांच्या कार विक्रीसाठी प्रत्यक्षात १ लाख ६२ हजार रुपये जीएसटी भरावा लागेल. हा जीएसटी भरण्यासाठी तुम्हाला तुमचे कपडेही विकावे लागतील! निर्मला सीतारमण या जीनियस आहेत.

# भागवत हे काही हिंदू धर्माचे प्रमुख नाहीत

## मोहन भागवत जे म्हणाले ते त्यांचं व्यक्तिगत मत : रामभद्राचार्य

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांचं एक वक्तव्य सध्या गाजतं आहे. त्यावर शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी टीका केली होती. ज्या पाठोपाठ आता महंत रामभद्राचार्य यांचंही वक्तव्य समोर आलं आहे. सरसंघचालक मोहन भागवत यांना जे म्हणायचं आहे ते त्यांचं व्यक्तिगत म्हणणं असू शकेल ते काही हिंदू धर्माचे प्रमुख नाहीत असं महंत रामभद्राचार्यांनी म्हटलं आहे.**



प्रत्येक मशिदीखाली मंदिर असल्याचा दावा करून कसं चालणार? कोणत्याही प्रार्थनास्थळांखाली हिंदू मंदिरे असण्याचा दावा करणे स्वीकारहार्य नसल्याचं मोहन भागवत यांनी म्हटलं होतं, त्यांच्या याचा विधानाचा दाखल देत शंकराचार्यांनी मोहन भागवतांवर टीकास्त्र सोडलं. राजकीय सोयीनुसार त्यांनी विधानं केली असा आरोपही शंकराचार्य यांनी केला. त्यापाठोपाठ आता रामभद्राचार्यांनीही मोहन भागवत यांच्यावर टीका केली.“ज्या आपल्या ऐतिहासिक वास्तू आहेत, त्या आपल्याला मिळाल्याच पाहिजेत किंवा त्या आपण ताब्यात घेतल्याच पाहिजेत. साम-दाम-दंड-भेद कुठलाही मार्ग असो आपल्या आपल्या संस्कृतीचा वारसा ताब्यात घेतला पाहिजे. मोहन भागवत जे म्हणाले ते त्यांचं व्यक्तिगत मत आहे. ते कदाचित संघाच्या वतीने बोलले असतील कारण ते सरसंघचालक आहेत. पण मोहन भागवत हे काही हिंदू धर्माचे प्रमुख नाहीत. हिंदू धर्माची व्यवस्था ही हिंदू आचार्यांच्या हाती आहे. कुठल्याही एका संघटनेच्या प्रमुखांच्या हाती नाही.”शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी मोहन भागवत यांच्या विधानाशी सहमत नसल्याचं म्हटलं आहे. मोहन भागवत राजकीयदृष्ट्या सोयीची भूमिका घेत असल्याचा आरोप त्यांनी केला. अविमुक्तेश्वरानंद सरस्वती म्हणाले, जेव्हा त्यांना सत्ता हवी होती तेव्हा ते मंदिरांबद्दल बोलत राहिले. आता सत्ता आल्यावर मंदिरं शोधू नका असा सल्ला ते देत आहेत, असं शंकराचार्यांनी म्हटलं आहे.पुण्यात हिंदू सेवा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मोहन भागवत म्हणाले होते की अयोध्येत राम मंदिर व्हावं ही अनेकांची इच्छा होती.

### मशिदींच्या खाली मंदिरं आहेत

मंदिर त्या ठिकाणी झालंही. मात्र आता तिरस्कार किंवा शत्रुत्वासाठी नवे मुद्दे निर्माण करण्याची आवश्यकता नाही. आपण जगाला हे दाखवून दिलं पाहिजे की आपण सगळे सहिष्णुतेने आणि सद्भावनेने राहात आहोत. गेल्या काही दिवसांपासून मशिदींच्या खाली मंदिरं आहेत असा दावा केला जातो आहे. उत्तर प्रदेशातल्या संभल या ठिकाणी मागील महिन्यात दंगल उसळली आणि चार लोकांचा मृत्यू झाला. मात्र रामभद्राचार्य यांनी मोहन भागवत हे हिंदू धर्माचे प्रमुख नाहीत असं म्हटलं आहे.

# दीपिका पादुकोणने दाखवला लेकीचा चेहरा

बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंह आणि अभिनेत्री दीपिका पादुकोण मुलगी दुआ पादुकोण सिंह जवळपास चार महिन्यांची झाली आहे. आता रणवीर व दीपिकाने एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात त्यांनी दुआची पापाराझींशी ओळख करून दिली. सप्टेंबरमध्ये दुआचा जन्म झाला, त्यानंतर आता दोघेही पहिल्यांदाच जोडीने पापाराझींसाठी आयोजित इव्हेंटमध्ये दिसले. दीपिका व रणवीर यांनी लेकीचा चेहरा अद्याप रिव्हील केलेला नाही. पण सोमवारी (२३ डिसेंबरला) दीपिका आणि रणवीर यांनी त्यांच्या लाडक्या लेकीचा चेहरा पापाराझींना दाखवला. बॉलीवूडच्या इतर जोडप्यांप्रमाणेच या जोडप्यानेही आपल्या बाळाचे फोटो न काढण्याची विनंती पापाराझींना केली आहे.या पार्टीत दीपिका पादुकोणने बेज रंगाचा सुंदर लांब ड्रेस परिधान केला होता. तर रणवीर सिंहने पांढऱ्या रंगाचा को-ऑर्ड सेट घातला होता. या दोघांचे अनेक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. ज्यामध्ये ते हसत पोज देताना दिसतात. एका व्हिडीओमध्ये रणवीर पत्नी दीपिकाच्या गालावर किस करताना दिसलापहिल्या मुलीचे स्वागत केले. त्यांनी मुलीचे नाव दुआ पादुकोण सिंह ठेवले आहे. या जोडप्याने अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या प्री-वेडिंग सोहळ्यात सहभागी होण्यासाठी जामनगरला जाण्यापूर्वी फेब्रुवारी २०२३ मध्ये गरोदरपणाची घोषणा केली.

# जस्टिन बाल्डोनी याच्यावर लैंगिक छळाचे आरोप

हॉलीवूड अभिनेत्री ब्लेक लाइव्हलीने तिच्या 'इट ऑल एंड्स विद अस' सिनेमातील सहकलाकार आणि दिग्दर्शक जस्टिन बाल्डोनी याच्यावर लैंगिक छळाचे आरोप केले आहेत. या आरोपांबद्दल कंगना रणौत यांनी त्यांचे मत मांडले आहे. त्यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर या प्रकरणाला 'चिंताजनक' आणि 'लाजिरवाणे' असे म्हटले आहे. त्यांनी याची तुलना बॉलीवूडशी करताना मल्याळम चित्रपटसृष्टीतील समस्या मांडणाऱ्या 'हेमा कमिटी' अहवालाचा संदर्भ दिला. हा अहवाल याच वर्षी प्रकाशित झाला होता. कंगना यांनी असेही म्हटले की मनोरंजन क्षेत्रात महिलांनी तडजोडीस (COMPROMISE)नकार दिल्यास त्यांना बदनाम केले जाते आणि त्याचा त्यांच्या करिअरवर नकारात्मक परिणाम होतो. कंगना यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर लिहिले, "ज्या महिला तडजोड करायला नकार देतात, त्यांना बदनाम केले जाते आणि त्यांचे करिअर उद्ध्वस्त होते. हे केवळ बॉलीवूडपुरते मर्यादित नाही. अशाच प्रकारचा अहवाल, 'हेमा कमिटी', मल्याळम चित्रपटसृष्टीतून समोर आला होता. ही गोष्ट चिंताजनक आणि लाजिरवाणी आहे."बीबीसी'च्या रिपोर्टनुसार, ब्लेक लाइव्हलीने २१ डिसेंबर २०२४ रोजी जस्टिन बाल्डोनीविरुद्ध खटला दाखल केला आहे. या खटल्यात तिने जस्टिन बाल्डोनीवर लैंगिक छळाचा आणि कामाच्या ठिकाणी गैर व्यवहार करणे असे आरोप केले आहेत. जस्टिन बाल्डोनीने ब्लेक लाइव्हलीच्या वजनावरही भाष्य केले असा त्याच्यावर करण्यात आला आहे.

# गौतमी करणार लग्न!



गौतमी देशपांडे ही सोशल मीडियावर कमालीची सक्रीय असते. माझा होशील ना मालिकेतून गौतमी घराघरात लोकप्रिय झाली. गौतमीने तिच्या चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे. नुकतीच गौतमी लग्न करत आहे. गौतमीने सोशल मीडियावर मेहंदीचे खास फोटो शेअर करत सर्वांना ही गुड न्यूज दिलीय. कोण आहे गौतमीचा होणारा नवरा? जाणून घ्या. गौतमीने नुकतेच तिच्या सोशल मीडियावर मेहंदीचे फोटो शेअर केलेत. गौतमीने हे फोटो शेअर करताना लिहिलंय की, माझ्या सिक्रेट सांताचं आगमन थोडं लवकर झालंय. खुप आनंद आणि प्रेम असं कॅप्शन देत गौतमीने ही खास बातमी शेअर केलीय. गौतमी देशपांडे तिचा बॉयफ्रेंड स्वानंद तेंडूलकर सोबत लग्न करणार आहे. स्वानंद हा एक इनफ्लुएन्सर आणि सोशल मीडिया स्टार आहे. स्वानंद भाडिपा या प्रसिद्ध युट्यूब चॅनलमध्ये सक्रिय आहे. स्वानंद एक डिजीटल क्रिएटर असून त्याचे अनेक रिल्स व्हिडीओ व्हायरल होत असतात. गौतमी - स्वानंदच्या चाहत्यांनी त्यांचं कमेंट्सच्या माध्यमातून अभिनंदन केलंय. गौतमीने नुकतेच तिच्या सोशल मीडियावर मेहंदीचे फोटो शेअर केलेत. गौतमीने हे फोटो शेअर करताना लिहिलंय की, माझ्या सिक्रेट सांताचं आगमन थोडं लवकर झालंय. खुप आनंद आणि प्रेम असं कॅप्शन देत गौतमीने ही खास बातमी शेअर केलीय.

# फिल्टरपाड्याचा बच्चन हिंदी सिनेमात




'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या विनोदी कार्यक्रमामुळे अभिनेता गौरव मोरे घराघरांत लोकप्रिय झाला. गेली काही वर्ष नाटक, वैविध्यपूर्ण मराठी चित्रपटांमधून तो प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहे. विनोदाचं अचूक टायमिंग साध गौरवने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे. काही महिन्यांपूर्वी गौरवने हास्यजत्रेतून प्रेक्षकांचा निरोप घेतला पण, वैयक्तिक आयुष्यात आपल्या करिअरमध्ये एक पाऊल पुढे टाकत तो लवकरच हिंदी चित्रपटात झळकणार आहे. याची माहिती गौरवने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत दिली आहे. महाराष्ट्राच्या प्रेक्षकांना खळखळून हसवणारा गौरव मोरे ( GAURAV MORE ) लवकरच हिंदी चित्रपटात झळकणार आहे. यासंदर्भात अभिनेत्याने इन्स्टाग्रामवर खास पोस्ट शेअर केली आहे. "नवीन वर्षाची सुरुवात नव्या कामाने करतोय आशीर्वाद असू द्या" असं म्हणत अभिनेत्याने त्याच्या चित्रपटाचं पहिलं पोस्ट शेअर केलं आहे.गौरव मोरेची ( GAURAV MORE ) महत्त्वाची भूमिका असलेला 'संगी' हा हिंदी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन सुमित कुलकर्णी यांनी केलं असून, लेखन थोपटे विजयसिंह सर्जेराव यांचं आहे. रोहन भोसले, अरुण प्रभुदेसाई, पिंटू सॉ, मोनिका प्रभुदेसाई, प्रतीक ठाकूर, सुमित कुलकर्णी हे 'संगी'चे निर्माते आहेत. यामध्ये शारिब हाश्मी, संजय बिष्णोई, श्यामराज पाटील, विद्या माळवदे आणि गौरव मोरे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. संगी म्हणजेच मैत्री... त्यामुळे याचं कथानक मैत्रीभोवती फिरणारं आहे. मात्र, पोस्टरमध्ये तीन मित्र दिसत असतानाच काही नोटाही दिसत आहेत. त्यामुळे आता पैसे आणि मैत्री यांचा एकमेकांशी काय संबंध असणार हे जाणून घेण्यासाठी १७ जानेवारीपर्यंत प्रतीक्षा करावी लागणार आहे.चित्रपटाचे दिग्दर्शक सुमित कुलकर्णी म्हणाले, " 'संगी' हा फक्त एक चित्रपट नाही तर प्रत्येकाच्या आयुष्यातील हास्यरसाचा अनुभव आहे. हा एक कौटुंबिक चित्रपट असला तरी घरातील प्रत्येकाने हा चित्रपट आपल्या मित्रपरिवारासह आवर्जून पाहावा. हा चित्रपट अनेकांना नॉस्टॅल्जिक बनवेल. 'संगी' विनोदी चित्रपट असला तरी यात भावनाही दडलेल्या आहेत."

# फसवणुकीबद्दल सनी लिओनीने दिली प्रतिक्रिया





बॉलीवूड अभिनेत्री सनी लिओनीच्या नावे एका सरकारी योजनेचा लाभ घेण्यात आला आहे. चक्क तिच्या खात्यामध्ये या योजनेचे पैसे जमा होत होते. छत्तीसगड सरकारची 'महतारी वंदन योजना' (MAHATARI VANDAN YOJANA) आहे. या योजनेच्या लाभार्थ्यांमध्ये सनी लिओनीचे नाव आहे. इतकंच नाही तर सरकारने तिच्या नावावर पैसेही पाठवले. आता सनीने या प्रकरणावर प्रतिक्रिया दिली आहे. छत्तीसगडमधील एका व्यक्तीने आर्थिकदृष्ट्या अक्षम विवाहित महिलांना दरमहा एक हजार रुपये देण्याच्या सरकारी योजनेंतर्गत लाभार्थी म्हणून सनी लिओनीच्या नावे खातं उघडलं होतं. सनीला यासंदर्भात माहिती मिळाल्यावर तिने या कृत्याबद्दल संताप व्यक्त केला आहे.सनीने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये लिहिलं, "छत्तीसगडमधील फसवणुकीच्या घटनेबद्दल मला समजलं. हे खूप दुर्दैवी आहे. माझी ओळख आणि नाव फसवणुकीसाठी वापरण्यात आले आहे. महिला सक्षमीकरणासाठी सरकारने आणलेल्या योजनेचा अशा प्रकारे गैरवापर होतोय हे पाहून वाईट वाटत आहे."छत्तीसगड सरकार विवाहित महिलांना 'महतारी वंदन योजने'अंतर्गत दर महिन्याला १००० रुपये देते. या योजनेत एका व्यक्तीने सनी लिओनीच्या नावाने ऑनलाइन खातं उघडलं होतं. त्या खात्यात तिला लाभार्थी म्हणून पैसे मिळत होते. महतरी योजनेच्या वेबसाईटवर सनी लिओनीच्या नावे खातं होतं. तिच्या पतीचे नाव जॉनी सिन्स नोंदवण्यात आले आहे. बस्तरमध्ये एका अंगणवाडीतून हा अर्ज करण्यात आला होता. या योजनेचे काही हप्ते सनी लिओनीच्या नावे असलेल्या खात्यात जमा झाले होते, अशी माहिती समोर आली आहे.सनी लिओनीच्या नावे बनावट अकाउंट उघडून या योजनेचा लाभ घेतला जात असल्याचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर बस्तरचे अधिकारी तपास करत आहेत.

# हरलीन देओलचे पहिले आंतरराष्ट्रीय शतक!

## भारताने वनडेमध्ये वेस्ट इंडिजविरूद्ध उभारली सर्वात मोठी धावसंख्या

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय महिला क्रिकेट संघाची फलंदाजी हरलीन देओल हिने सध्या सुरू असलेल्या वेस्ट इंडिज महिला संघाविरूद्ध ११५ धावांची शानदार खेळी करत आपले पहिले शतक झळकावले आहे. हरलीन देओलच्या शतकाच्या जोरावर भारताने पहिल्यांदा फलंदाजी करत ३५० अधिक धावांचा टप्पा गाठला. हरलीन देओलने या शतकी खेळीत १०३ चेंडूत १६ चौकारांच्या मदतीने महत्त्वपूर्ण ११५ धावांची खेळी केली.**



टीम इंडियाची युवा स्टार हरलीन देओलने वेस्ट इंडिजविरुद्ध खेळल्या जात असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात शानदार शतक झळकावले आहे. तिचे हे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पहिले शतक आहे. तिने अवघ्या ९८ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. या सामन्यात हरलीन फलंदाजीला आली जेव्हा टीम इंडियाने ११० धावांवर पहिली विकेट गमावली. यानंतर तिच्या शानदार फलंदाजीमुळे भारताने ३०० धावांचा टप्पा पार केला. शतकी खेळी केल्यानंतर चौकारांचा पाऊस पाडत मग ती बाद झाली. हरलीनने ११.६५ च्या स्ट्राईक रेटने जबरदस्त फलंदाजी केली.भारतीय महिला संघ आणि वेस्ट इंडिज महिला संघ यांच्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील पहिला सामना टीम इंडियाने जिंकला होता. दुसऱ्या सामन्यात भारतीय संघ प्रथम फलंदाजी केली आणि भारताने वनडेच्या इतिहासातील वेस्ट इंडिजविरूद्ध सर्वात मोठी धावसंख्या उभारली आहे. भारताने वेस्ट इंडिजविरूद्ध ५ बाद ३५८ धावा केल्या. तर दुसऱ्यांदा भारताने वनडेमध्ये ३५० अधिक धावांचा टप्पा गाठला आहे.भारताकडून सलामीला उतरलेल्या स्मृती मानधना आणि प्रतिका रावल यांनी पहिल्या विकेटसाठी ११० धावांची भागीदारी केली.

यादरम्यान लयीत असलेल्या स्मती मानधनाने आपले अर्धशतक पूर्ण केले आणि यानंतर ती ५३ धावा करत धावबाद झाली. तर प्रतिका रावने ७६ धावांची खेळी करत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील आपले पहिले अर्धशतक केले. कर्णधार हरमनप्रीत कौर २२ धावा करत बाद झाली तर जेमिमा रोड्रिग्जने ३६ चेंडूत १ षटकार आणि ६ चौकारांच्या खेळीसह ५२ धावा करत झटपट अर्धशतक पूर्ण केले. तर ऋचा घोषने २ चौकारांसह भारताची धावसंख्या ३५० पार नेत मोठी धावसंख्या उभारली.हरलीन देओलने तिच्या एकदिवसीय कारकिर्दीत १५ एकदिवसीय सामन्यांमध्ये ४३६ धावा केल्या आहेत. या सामन्यापूर्वी वनडे क्रिकेटमध्ये हरलीनची सर्वोच्च धावसंख्या ७७ धावा होती, जी आता ११५ धावा झाली आहे. भारतासाठी २४ टी-२० सामन्यांमध्ये तिने २५१ धावा केल्या आहेत. हरलीनने ११.६५ च्या स्ट्राईक रेटने जबरदस्त फलंदाजी केली.भारतीय महिला संघ आणि वेस्ट इंडिज महिला संघ यांच्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील पहिला सामना टीम इंडियाने जिंकला होता. दुसऱ्या सामन्यात भारतीय संघ प्रथम फलंदाजी केली आणि भारताने वनडेच्या इतिहासातील वेस्ट इंडिजविरूद्ध सर्वात मोठी धावसंख्या उभारली आहे. भारताने वेस्ट इंडिजविरूद्ध ५ बाद ३५८ धावा केल्या. तर दुसऱ्यांदा भारताने वनडेमध्ये ३५० अधिक धावांचा टप्पा गाठला आहे.भारताकडून सलामीला उतरलेल्या स्मृती मानधना आणि प्रतिका रावल यांनी पहिल्या विकेटसाठी ११० धावांची भागीदारी केली. यादरम्यान लयीत असलेल्या स्मती मानधनाने आपले अर्धशतक पूर्ण केले आणि यानंतर ती ५३ धावा करत धावबाद झाली. तर प्रतिका रावने ७६ धावांची खेळी करत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील आपले पहिले अर्धशतक केले. भारतीय महिला क्रिकेट संघाची फलंदाजी हरलीन देओल हिने सध्या सुरू असलेल्या वेस्ट इंडिज महिला संघाविरूद्ध ११५ धावांची शानदार खेळी करत आपले पहिले शतक झळकावले आहे. हरलीन देओलने या शतकी खेळीत १०३ चेंडूत १६ चौकारांच्या मदतीने महत्त्वपूर्ण ११५ धावांची खेळी केली.

### अवघ्या 98 चेंडूत आपले शतक पूर्ण

टीम इंडियाची युवा स्टार हरलीन देओलने वेस्ट इंडिजविरुद्ध खेळल्या जात असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात शानदार शतक झळकावले आहे. तिचे हे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील पहिले शतक आहे. तिने अवघ्या ९८ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. या सामन्यात हरलीन फलंदाजीला आली जेव्हा टीम इंडियाने ११० धावांवर पहिली विकेट गमावली. यानंतर तिच्या शानदार फलंदाजीमुळे भारताने ३०० धावांचा टप्पा पार केला. शतकी खेळी केल्यानंतर चौकारांचा पाऊस पाडत मग ती बाद झाली. हरलीनने ११.६५ च्या स्ट्राईक रेटने जबरदस्त फलंदाजी केली.भारतीय महिला संघ आणि वेस्ट इंडिज महिला संघ यांच्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळवली जात आहे. यादरम्यान लयीत असलेल्या स्मती मानधनाने आपले अर्धशतक पूर्ण केले आणि यानंतर ती ५३ धावा करत धावबाद झाली. तर प्रतिका रावने ७६ धावांची खेळी करत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील आपले पहिले अर्धशतक केले.

# तिसऱ्या कसोटीसाठी तनुष कोटियनला संधी

## तनुष कोटियनला संधी देण्यामागचं सांगितलं खरं कारण

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघ गुरुवार २६ डिसेंबरपासून ऑस्ट्रेलियाविरुद्ध चौथा कसोटी सामना खेळणार आहे. रवीचंद्रन अश्विनच्या अचानक निवृत्तीच्या निर्णयानंतर तो मायदेशी परतला आहे. आता टीम इंडियामध्ये मुंबई क्रिकेट संघाचा अष्टपैलू खेळाडू तनुष कोटियन याला संघात सामील केलं आहे. अक्षर पटेल आणि कुलदीप यादवसारखे उत्कृष्ट फिरकीपटूंचे पर्याय असतानाही संघाने तनुषला संधी का दिली, हे रोहित शर्माने सामन्यापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.**




याबरोबरच रोहित शर्मानेही त्याच्या फिटनेसबाबत अपडेट दिले. अश्विनच्या जागी तनुषची निवड का करण्यात आली, असा प्रश्न रोहित शर्माला विचारण्यात आला. रोहितने सांगितले की, “हो तनुष महिन्याभरापूर्वी ऑस्ट्रेलियामध्ये होता. कुलदीप, माझ्यामते त्याच्याकडे व्हिसा नाही आहे. आम्हाला असं कोणीतरी हवं होतं की जो लगेच ऑस्ट्रेलियासाठी रवाना होईल आणि पोहोचेल, तनुष यासाठी तयारीत होता. मस्करी करतोय. तनुष ऑस्ट्रेलियामध्ये खेळला आहे. त्याने गेल्या १-२ वर्षांमध्ये देशांतर्गत क्रिकेटमध्ये केलेली कामगिरी आपण पाहिली आहे. जर मेलबर्न किंवा सिडनी कसोटीमध्ये दोन फिरकीपटूंची गरज भासली तर आम्हाला बॅकअप म्हणून खेळाडू हवा होता.”कुलदीप यादवकडे व्हिसा नाही असं रोहित शर्मा पत्रकार परिषदेदरम्यान गंमतीत म्हणाला. पण कुलदीप यादववर शस्त्रक्रिया झाल्याचे रोहित शर्माने सांगितले तर अक्षर पटेल नुकताच बाबा झाल्यामुळे त्याने वैयक्तिक कारण देत उपलब्ध नसल्याचे सांगितले.

### कुलदीप 100 टक्के फिट नाही

यानंतर रोहित म्हणाला, “कुलदीप १०० टक्के फिट नाहीय. त्याच्यावर हर्नियाची शस्त्रक्रिया झाली. अक्षर पटेल नुकताच बाबा झाला आहे त्यामुळे तो संघाबरोबर प्रवास करू शकत नाही. म्हणूनच आम्ही तनुषला संधी दिली जो आमच्यासाठी सर्वोत्तम पर्याय होता. मुंबईच्या रणजी विजयात त्याने महत्त्वाची भूमिका बजावली होती. एक अष्टपैलू खेळाडू म्हणून त्या सामन्यात त्याने मोठी भूमिका बजावली होती. संघासाठी तो एक उत्तम पर्याय आहे.”भारतीय कर्णधाराने त्याच्या गुडघ्याच्या दुखापतीबाबत अपडेट दिली आहे.